महाराष्ट्र शासन
वन विभाग

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकिय भवन, पोटेगाव रोड, गडचिरोली (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्रमांक- 07132-233184 फॅक्स क्रमांक & 07132-233187 Email- ccfgad@gmail.com

क्रमांकः-कक्ष-2(8)/जमीन/प्र.क्र. रस्ते/2022/ 1293 गडचिरोली, दिनांकः- 23 /02/2022.

प्रति,

मा. अपर प्रधार मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपुर.

विषयः- **Proposal under Forest Conservation Acts 1980, Forest Land- 54.65 Ha.**
**वन (संवर्धन) नियम, 1980 अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353 सी मौजा गिताली - मोसम - झामेला नाला या रस्त्याचे रुंदीकरण संबधातील प्रस्ताव 54.65 हे. वनक्षेत्र जि. गडचिरोली वळतीकरणासाठी.**

संदर्भः-1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17/1/नोडल/गडचिरोली/आयडी12987/1909, दिनांक 24.12.2021.
2) उपवनसंरक्षक (प्रा.), आलापल्ली वनविभाग यांचे पत्र क्र. कक्ष-7/सर्व्हे/जमिन/1527, दिनांक 17.02.2022

---ooo---

**कार्यकारी अभियंता (रा.मा.), राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांचेकडून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353 सी मौजा गिताली - मोसम - झामेला नाला या रस्त्याअंतर्गत 54.65 हे.** वनक्षेत्राचा प्रस्ताव उपवनसंरक्षक (प्रा.), आलापल्ली यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव उपवनसंरक्षक (प्रा.), आलापल्ली यांनी स्थळनिरीक्षणासह पुढील उचित कार्यवाही करून या कार्यालयात सादर केला. सदर प्रस्ताव आपल्या कार्यालयकडे सादर करण्यात आला.

प्रकरणी, संदर्भिय पत्र क्र. 1 प्रमाणे सदर प्रस्तावात 1 ते 9 मुद्दयांवर खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले. सदर खुलासा उपवनसंरक्षक आलापल्ली यांचेकडून अनुपालन अहवालसह या कार्यालयात प्राप्त झाला आहे. प्रकरणी अनुपालन अहवाल पुढील उचित कार्यवाहीस सादर करण्यात येत आहे.
सहपत्रः- अनुपालन अहवाल मुळ 4 प्रतीत.

(डॉ. किशोर एस. मानकर)
वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली वनवृत्त.

23.2.22

प्रतिलीपीः- उपवनसंरक्षक (प्रा.), आलापल्ली यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलीपीः- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

# उपवनसंरक्षक आलापल्ली वन विभाग, आलापल्ली यांचे कार्यालय
## चंद्रपुर रोड, आलापल्ली (महाराष्ट्र)
दूरध्वनी कमांक 07133–266433, फॅक्स नंबर 07133–266433 इमेल **dycfalpli@gmail.com**


मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली
22 FEB 2022
गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली
आवक क्र.....12621
22/02/2022

विषयः–वन (संवर्धन)अधिनियम 1980 अंतर्गत वनजमिन क्षेत्र 54.65 हे. राष्ट्रीय महामार्ग 353 सी मौजा गिताली, मोसम, झमेला नाला या रस्त्याचे प्रस्तावाबाबत.

कमांक कक्ष 7/सर्व्हे/जमिन/ 1527
आलापल्ली दि. :- 17/02/2022

प्रति,
मा. वनसंरक्षक (प्रा.)
गडचिरोली

संदर्भ –आपले कार्यालयांचे पत्र कं. 2(8)/जमीन/प्र.कं.रस्ते/2022/3729 दि.17.01.2022

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग 353 सी मौजा गिताली, मोसम, झमेला नाला क्षेत्र 54.65 हे. आर वनक्षेत्र मागणी प्रस्तावातील त्रृटयाची पुर्तता करून खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क. | मुद्दे | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावासोबत प्राप्त भाग–2 मध्ये एकुण तोडणा–या वृक्षाची संख्या 4536 नमूद केलेली असुन पृष्ठ क. 23,24 व 25 मध्ये दिलेल्या प्रमणपत्रत व पृष्ठ क. 172 वर नमूद Site Inspection Report मध्ये वृक्षतोडीच्या अहवालात 4541 वृक्षाची नोंदी केलेली आहे. त्यामुळे आपले स्तरावर प्रस्तावाची सखोल चौकशी करुन नेमकी किती वृक्षची तोड होणार आहे. याबाबतची संख्या नमुद करावी. व तसे प्रमाणपत्रात दुरुस्ती करावे. तसेच गडचिरोली जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र 14,41,200 हे. नमूद असून 2,13,118.08 हे. वनक्षेत्र नमुद केलेले आहे. यापुर्वी सादर केलेल्या 12.06 हे. 22.438 या प्रस्तावामध्ये गडचिरोली जिल्हयाचे क्षेत्रफळ 4308.20 चौ.कि.मी. व वनक्षेत्र 3641.92 चौ.कि.मी. असे नमुद आहे. या तफावतीबाबत खुलासा करावा. तसेच नेमके किती क्षेत्र आहे याबाबत तपासणी करुन खात्री करावी. | सदर प्रस्तावामील प्रस्तावित क्षेत्रात एकुण 4541 वृक्ष आहेत तरी 4541 वृक्ष ग्राहय धरावे. तसेच गडचिरोली जिल्याचा भोगोलीक क्षेत्र हे 16517.59 चौ.की.मी. व आलापल्ली वनविभागाचे 2000.59 चौ. कीमी. वनक्षेत्र असल्याचे ग्राहय धारावे हि विनंती. (Page no. 1) |
| 2 | पृष्ठ क. 13 वरील क्षेत्रविवरणाचे तपशिलामध्ये Area in Sq-Mt. व Area in Ha. मध्ये Decimal Point चे पुर्वी व नंतर येणारे क्षेत्र बरेच ठिकाणी चूकीचे नमुद केलेले आहे, त्यामध्ये दुरुस्ती करावी. पृष्ठ क. 18 वर नमुद प्रमाणपत्रात प्रस्तावित रस्त्याचे प्राणहिता अभयारण्यापासून अंतर 3.500 कि.मी. असल्याचे नमुद आहे. परंतू प्रस्तावित रस्ता व प्राणहिता अभयारण्याचे क्षेत्र दर्शविणारा नकाशा या सोबत सादर केलेला नाही, तो सादर करण्यात यावा. | सदर प्रस्तावातील प्रस्तावित क्षेत्र 54.657 हे. आर. क्षेत्र ग्राहय धरावे. या सोबत सुधारीत प्रत सादर करण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित रस्ता व प्राणहिता अभयारण्याचे क्षेत्र दर्शविणारा नकाशा या सोबत सादर करण्यात येत आहे. (Page no. 2 to 12) |

| | | |
|---|---|---|
| 3 | पृष्ठ क्र. 27 ते 104 मध्ये नागेपल्ली, चेरेपल्ली, तानबोडी, दिनाचेरेपल्ली, ईत्तलचेरु, मोसम, लगाम या क्षेत्रामध्युन जाणा–या मुख्य रस्त्याच्या मध्यभागापासून 11 मिटर अंतरावरील डाव्या बाजूच्या झाडाची यादी नमूद केलेली आहे. त्यामध्ये Enumeration list of project affected trees proposed to felled in the proposal is submitted in vernacular language मध्ये माहिती सादर करावी. | यादी तयार करून सहपत्रीत करण्यात येत आहे. (Page no. 13 to 103) |
| 4 | पुष्ठ क. 171 वर नमूद Site Inspection Report मध्ये नमूद वनखंड क. 891,189, 183 ची नोंद असून पृष्ठ क. 13 वन नमुद Area Statement मध्ये त्याबाबत नोंद केलेली नाही. सदर वनखंडातील क्षेत्रचा समावेश प्रस्तावित रस्त्यात केलेला आहे किंवा नाही, याबाबत खुलासा करावा. | पुष्ठ कमांक 171 वर नमुद केलेले 891 व 183 वनखंडाचा समोवेश संगनकामध्ये तयार करताना नजर चुकीने नमुद करण्यात आले नव्हते. सदर माहिती अदयावत करून Area Statement या सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. तसेच Site Inspection Report मध्ये 187 च्या ठिकाणी 189 झाले आहे तरी 187 असे ग्राहय धरावे. आवश्यक दुरूस्तीकरीता प्रकल्प यंत्रणेचे प्रतीनिधीना पाठविण्यात येत आहे. |
| 5 | पृष्ठ क. 182 व 183 वरील भाग 1 मध्ये सहपत्र जोडल्याचे नमुद केले असून त्यावर पृष्ठ कमांकाची नोंद केलेली नाही, ती करण्यात यावी. | भाग 1 मध्ये जोडण्यात आलेले Annexure-1 Page no 184 to 186, Annexure-2 Page no 187 to 189, Annexure-3 Page no 190 to 199 आवश्यक दुरूस्तीकरीता प्रकल्प यंत्रणेचे प्रतीनिधीना पाठविण्यात येत आहे. |
| 6 | पृष्ठ क. 186 वर नमुद Annexure-I मध्ये दिनांक नमुद केलेले नाही. | Annexure-1 चा दिनांक 29.10.2021 असे समजावे. आवश्यक दुरुस्तीकरीता प्रकल्प यंत्रणेचे प्रतीनिधीना पाठविण्यात येत आहे. |
| 7 | पृष्ठ क. 191 ते 199 पर्यंत सादर केलेल्या परिशिष्ट –3 मध्ये नमुद क्षेत्रविवरणाचे तपशिलामध्ये ब–याच ठिकाणी Decimal Point चे पुर्वी व नंतर येणारे क्षेत्रची आकडेवारी चूकीची नमुद केलेली आहे. त्याची तपासणी करुन दुरुस्ती करण्यात यावी. | सुधारीत करून या सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे (Page no. 2 to 12) |
| 8 | पृष्ठ क. 236 वन नमुद नकाशामध्ये दर्शविलेल्या क्षेत्रविवरणात ब–याच दुरुस्ती करणे आवश्यक असुन त्या सुधारण्यात याव्यात. | नकाशामध्ये दर्शविलेल्या क्षेत्रविवरणात दुरुस्ती करून या सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. (Page no. 104) |
| 9 | पृष्ठ क. 257 मध्ये नमुद गावनकाशा मधील अहेरी तालुक्यातील वनविभागाचे ताब्यातील वनखंड क. 32 चे क्षेत्र विवरणात नमुद आहे. परंतु ते नकाशामध्ये दिसुन येत नाही. तसेच पृष्ठ क. 258 नमुद गाव नकाशामध्ये अहेरी तालुक्यातील वनविभागाचे ताब्यातील वनखंड क. 31,14 चे क्षेत्र विवरणात नमुद आहे. परंतु ते नकाशामध्ये दिसुन येत नाही. याबाबत खुलासा करावा. | कार्य आयोजना तयार करताना जुना वनखंडाचे नविन वनखंड कमांक देण्यात आलेला आहे. सदर माहितीमध्ये जुना व नविन वनखंड म्हणुन नमुद करण्यात आलेला आहे नकाशामध्ये फक्त नविन वनखंड नमुद केले असल्याने सदर वनखंड नकाशामध्ये दिसुन येत नाही. आवश्यक दुरूस्तीकरीता प्रकल्प यंत्रणेचे प्रतीनिधीना पाठविण्यात येत आहे. |

<u>सहपत्र</u> :– वरील प्रमाणे

(signature)

उप वनसंरक्षक
आलापल्ली वनविभाग आलापल्ली

प्रतिलिपीः– कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.